RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ४७(४)] गुरुवार, एप्रिल ९, २०२६/चैत्र १९, शके १९४८ [पृष्ठे १४, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १७१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**जलसंपदा विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ एप्रिल, २०२६.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक परीक्षा-२०१९/(प्र.क्र.१२३/२०१९)/आ.(प्रशि).— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे जलसंपदा विभागाच्या महासंचालक (संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता), महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक, यांच्या अधिनस्त वैज्ञानिक अधिकारी, गट ब या पदावर पदोन्नती देण्यासाठी पुढील विभागीय परीक्षा नियम करीत आहेत :-

१. **संक्षिप्त नाव** :- या नियमांस जलसंपदा विभागातील वैज्ञानिक अधिकारी, गट-ब या पदावर पदोन्नती देण्यासाठीचे विभागीय परीक्षा नियम, २०२६ असे म्हणावे.

२. **व्याख्या** :- या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर,-

(क) “परिशिष्ट” याचा अर्थ, या नियमांसोबत जोडलेले परिशिष्ट, असा आहे;

(ख) “नियंत्रक अधिकारी” याचा अर्थ, संबंधित क्षेत्रिय अधीक्षक अभियंता (गट-अ) असा आहे;

(ग) “महासंचालक” म्हणजे महासंचालक, (संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता), मेरी, नाशिक, असा आहे;

(घ) “परीक्षा” याचा अर्थ, या नियमांन्वये वैज्ञानिक अधिकारी, (गट-ब) पदावरील पदोन्नतीसाठी नियम ८ अन्वये परिशिष्ट “क” व परिशिष्ट “ख” नुसार विहित केलेल्या अभ्यासक्रमानुसार वैज्ञानिक अधिकारी (गट-ब) पदावर पदोन्नतीची पात्रता तपासण्यासाठी घेतली जाणारी परीक्षा, असा आहे;

(ङ) "संधी" याचा अर्थ, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांच्याकडून वरिष्ठ वैज्ञानिक सहायक, गट-क यांच्याकरिता वैज्ञानिक अधिकारी, गट-ब या पदावर पदोन्नतीसाठीची पात्रता तपासण्यासाठी आयोजित केलेल्या विभागीय परीक्षेस बसण्यास देण्यात आलेली संधी, असा आहे;

(च) "प्रबोधिनी" याचा अर्थ, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक असा आहे;

(छ) "वैज्ञानिक अधिकारी" याचा अर्थ, जलसंपदा विभागांतर्गत महासंचालक (संप्रजसंसु), महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक यांच्या अधिनस्त वैज्ञानिक अधिकारी (गट ब), असा आहे;

(ज) "वरिष्ठ वैज्ञानिक सहायक" याचा अर्थ, जलसंपदा विभागांतर्गत महासंचालक (संप्रजसंसु), महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक यांच्या अधिनस्त (पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे वगळून) गट-क मधील वरिष्ठ वैज्ञानिक सहायक (गट-क), असा आहे;

(झ) "जलसंपदा विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा जलसंपदा विभाग, असा आहे.

३. **परीक्षेला बसण्याची पात्रता** :- वरिष्ठ वैज्ञानिक सहायक (गट-क) पदावर नियुक्त केलेली व्यक्ती पदोन्नतीच्या विभागीय परीक्षेस बसण्यास पात्र राहील.

परंतु असे की, सेवाप्रवेश नियमानुसार वैज्ञानिक अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी व्यवसायिक परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट पूर्ण न करणारे तथापि, या अधिसूचनेच्या दिनांकापूर्वीच वैज्ञानिक अधिकारी या पदावर पदोन्नत झालेल्या सर्व अधिकाऱ्यांना सदरहू विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

४. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी संधीची संख्या** :- (एक) सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय वरिष्ठ वैज्ञानिक सहायक हे वैज्ञानिक अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र ठरणार नसल्यामुळे, परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या संधीवर कोणतीही मर्यादा नाही.

परंतु, सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापूर्वी वरिष्ठ वैज्ञानिक सहायकांना वैज्ञानिक अधिकारी पदावर पदोन्नती दिली असल्यास अशा अधिकाऱ्यांना सदर विभागीय परीक्षा तीन सलग संधीमध्ये उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

(दोन) सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांच्यामार्फत सलग ज्या तीन विभागीय परीक्षेचे आयोजन होईल, त्या परीक्षा उमेदवारांसाठी सलग तीन संधी म्हणून गणण्यात येतील.

परंतु, जी व्यक्ती, उक्त परीक्षेस बसण्यास पात्र आहे परंतु, जिने परीक्षा अर्ज सादर केलेला नाही किंवा जी परीक्षेला अनुपस्थित राहिलेली, ती अशा व्यक्तीची संधी म्हणून गणण्यात येईल.

५. **विहित संधीत परीक्षा उत्तीर्ण न होण्याचे परिणाम** :- सदर अधिसूचना राजपत्रात प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापूर्वी वैज्ञानिक अधिकारी या पदावर कार्यरत असणारे अधिकारी विहित संधीत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत अथवा सदर अधिसूचनेतील नियम क्र. ६ नुसार परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट प्राप्त होईपर्यंत संबंधितांची वेतनवाढ रोखण्यात येईल. संबंधित अधिकारी ज्या दिनांकास परीक्षा उत्तीर्ण होईल अथवा सदर अधिसूचनेतील नियम क्र. ६ अन्वये परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट प्राप्त होईल. त्या दिनांकानंतर येणाऱ्या जानेवारी किंवा जुलै महिन्यात संबंधित अधिकाऱ्याची रोखलेली वेतनवाढ अदा करण्यात येईल. परंतु, मागील कालावधीतील कोणतीही थकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

६. **परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट** :- ज्या व्यक्तीने वरिष्ठ वैज्ञानिक सहायक पदावर किमान पंधरा वर्षे सेवा पूर्ण केलेली आहे किंवा ज्या व्यक्तीस उक्त परीक्षा उत्तीर्ण न होता ही अधिसूचना प्रकाशित झाल्याच्या दिनांकापूर्वी वैज्ञानिक अधिकारी या पदावर पदोन्नती मिळाली आहे व उक्त वैज्ञानिक अधिकारी पदावर किमान पंधरा वर्षे सेवा पूर्ण झालेली आहे किंवा वयाची पन्नास वर्षे पूर्ण केलेली आहे, यापैकी, जे नंतर असेल,त्यानूसार त्यास उक्त परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.

७. **उत्तीर्ण झाल्याचा दिनांक** - परीक्षेच्या शेवटच्या पेपरच्या लगतनंतरचा दिवस, परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक म्हणून समजण्यात येईल.

८. **अभ्यासक्रम** - परीक्षेचे स्वरुप, प्रश्नपत्रिकांची संख्या, विषय व मिळवावयाचे किमान अर्हताकारी गुण, परिशिष्ट "क" मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील आणि परीक्षेचा अभ्यासक्रम परिशिष्ट "ख" मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असेल किंवा राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे निदेश देईल त्याप्रमाणे असेल.

९. **उत्तीर्ण होण्याचे मानक** - परीक्षा उत्तीर्ण होण्याचे मानक, प्रत्येक ऑनलाईन, प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षेमधील एकूण गुणांच्या पन्नास टक्के इतके असेल. अनुत्तीर्ण झाल्यास, अशा उमेदवाराने, ज्या विषयांत तो अनुत्तीर्ण झाला आहे त्याविषयाची परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

१०. **विशेष प्राविण्य** - जो उमेदवार पहिल्या प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण होईल आणि कोणत्याही विषयात सत्तर टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवेल, त्या उमेदवाराने, विशेष प्राविण्यासह परीक्षा उत्तीर्ण केली असल्याचे मानण्यात येईल आणि तशी नोंद, त्याच्या सेवा पुस्तकात नोंदविण्यात येईल.

११. **परीक्षा केव्हा घेण्यात येईल** - (एक) महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक यांच्याद्वारे वर्षातून एकदा, शक्यतो मार्च किंवा एप्रिल महिन्यात परीक्षा घेण्यात येईल, परीक्षा मराठी व इंग्रजी भाषेत घेण्यात येईल.

(दोन) प्रबोधिनी, परीक्षा पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या कालावधीत परीक्षेचा निकाल जाहीर करेल. प्रबोधिनीने जाहीर केलेला निकाल अंतिम असेल आणि निकाल जाहीर करण्यास विलंब झाल्यास, परीक्षा अविधिग्राहय ठरणार नाही.

१२. **प्रशिक्षण वर्ग** :- महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक, पात्र उमेदवारांना प्रशिक्षण देण्याकरिता एक महिन्याच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करील व परीक्षेच्या दिनांकापूर्वी किमान एक महिना अगोदर प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करण्यात येईल. प्रथमच परीक्षेस बसणाऱ्या पात्र अशा उमेदवारास प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणे अनिवार्य असेल. पात्र उमेदवारांना केवळ एकाच प्रशिक्षण सत्रास उपस्थित राहण्याची परवानगी असेल.

१३. **परीक्षा कक्षातील वर्तन** :- परीक्षा नियंत्रण अधिकारी, जर उमेदवार खालील नमूद केलेल्या रीतीने गैरवर्तन करत असल्याचे आढळून आले तर, अशा उमेदवाराला परीक्षेला बसण्यापासून निर्बंधित करेल आणि उमेदवाराला उर्वरित परीक्षेला बसण्यास मनाई करेल :-

(एक) कोणताही दस्तऐवज, पुस्तक, भ्रमणध्वनी, कोणतेही इलेक्ट्रॉनिक उपकरण किंवा इतर कोणतीही सामग्री जी प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी वापरली जाऊ शकते असे इतर कोणतेही साहित्य, यातून नक्कल करणे, ते बाळगणे किंवा ते वापरणे;

(दोन) इतर उमेदवारांसोबत संभाषण करणे;

(तीन) कोणत्याही बाबतीत इतर उमेदवारांकडून मदत घेणे;

(चार) इतर कोणत्याही उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेची नक्कल करणे;

(पाच) उत्तर पत्रिका फाडणे;

(सहा) जो परीक्षेत गैरप्रकार ठरू शकेल असा इतर कोणताही मार्ग किंवा वर्तनाची पद्धत.

१४. **विभागीय परीक्षेसंदर्भातील सामाईक धोरण** आणि सामान्य प्रशासन विभागाने त्यात वेळोवेळी केलेले बदल शासन निर्णय क्र. विपधो- २६२०/प्र.क्र.१६/का.१७, दिनांक ३१ मार्च, २०२१ या परीक्षा नियमास लागू असेल.

## परिशिष्ट-क

## नियम-८

जलसंपदा विभागांतर्गत महासंचालक (संप्रजसंसु), महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक यांच्या अधिनस्त वैज्ञानिक अधिकारी (गट- ब) पदावर पदोन्नतीसाठी विभागीय परीक्षेचे स्वरुप

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>विषय</th><th>प्रश्न पत्रिकेचे स्वरुप</th><th colspan="3">एकूण गुण</th><th>कालावधी</th><th colspan="3">उत्तीर्णता गुण</th></tr>
<tr><td>१.</td><td>धरणे - सांडवा व बांधकाम सामग्री</td><td>बहुपर्यायी प्रश्न- ऑनलाईन परीक्षा</td><td colspan="3">१००</td><td>१ तास ३० मिनिटे</td><td colspan="3">५०</td></tr>
<tr><td>२.</td><td>(१) महाराष्ट्र नागरी सेवा नियम.<br>(२) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकामे लेखा संहिता.<br>(३) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका १९८४.<br>(४) विविध नियम व कायदे.</td><td>बहुपर्यायी प्रश्न- ऑनलाईन परीक्षा</td><td colspan="3">१००</td><td>१ तास ३० मिनिटे</td><td colspan="3">५०</td></tr>
<tr><td rowspan="2">३.</td><td rowspan="2">प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षा- (खालीलपैकी एक सामग्रीची निवड करा.) माती व मुरूम, सिमेंट,फ्लायॲश, पाणी, वाळू, खडी, विटा, अंशशोधन, लाईम, मॉर्टर, स्टील,सीबीआर, भूकंपशास्त्र.</td><td rowspan="2">प्रात्यक्षिक व मौखिक परीक्षा</td><td>प्रात्यक्षिक</td><td>मौखिक</td><td>एकूण</td><td rowspan="2">३ तास</td><td>प्रात्यक्षिक</td><td>मौखिक</td><td>एकूण</td></tr>
<tr><td>७५</td><td>२५</td><td>१००</td><td>३८</td><td>१२</td><td>५०</td></tr>
<tr><td></td><td>एकूण गुण</td><td></td><td colspan="3">३००</td><td></td><td colspan="3">१५०</td></tr>
</table>

## परिशिष्टः ख

## ( नियम-८)

## वैज्ञानिक अधिकारी (गट- ब) पदावरील पदोन्नतीसाठीच्या विभागीय परीक्षेचा अभ्यासक्रम

## प्रश्नपत्रिका-१ : धरणे - सांडवा व बांधकाम सामग्री

(गुण-१००)

| अ. क्र. | घटक | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १ | धरणे | धरणाचे प्रकार – माती धरणे, रॉकफिल धरणे, दगडी व कॉंक्रीट धरणे, मातीची व ग्रॅव्हीटी धरणाची तुलना, कोलग्राउट, फेरोसिमेंट, इ. |
| २ | सांडवा | व्याख्या, कार्ये, सांडव्याचे प्रकार इ. |
| ३ | कालवे | व्याख्या, कालवा प्रणालीचे भाग, कालव्यांचे वर्गीकरण, कालवे डिस्चार्ज इ. |
| ४ | दगड | व्याख्या, दगडाचे प्रकार, गुणधर्म, दगडाची वैशिष्ट्ये, विविध चाचण्या इ. |
| ५ | खडी | व्याख्या, खडीचे प्रकार, खडीचे गुणधर्म, विविध चाचण्या इ. |
| ६ | चुना | व्याख्या, चुन्याचे वर्गीकरण, चुन्याचे गुणधर्म, चुन्याचा वापर, विविध चाचण्या इ. |
| ७ | माती | व्याख्या, मातीचे कार्य, मातीची वैशिष्ट्ये, एकीकृत मातीचे वर्गीकरण, मातीचा वापर, विविध चाचण्या इ. |
| ८ | वाळू | व्याख्या, वाळूचे स्त्रोत, वाळूचे वर्गीकरण, वाळूचे गुणधर्म, वाळूचा वापर, नैसर्गिक व कृत्रिम वाळू यांच्यात तुलना, विविध चाचण्या इ. |
| ९ | विटा | इतिहास, विटा वापरणे, विटांचे प्रकार, विटांचे घटक, विटांची वैशिष्ट्ये, विविध चाचण्या इ. |
| १० | सिमेंट | व्याख्या, सिमेंटचे प्रकार, विविध चाचण्या इ. |
| ११ | मॉर्टर | व्याख्या, मॉर्टरचे घटक, मॉर्टरचे गुणधर्म, मॉर्टरचे प्रकार, मॉर्टर व कॉंक्रिटचे मिक्स डिझाईन विविध चाचण्या इ. |
| १२ | राख (फ्लायअॅश) | व्याख्या, राखेचे गुणधर्म, राखेचा वापर, विविध चाचण्या इ. |
| १३ | भूकंपशास्त्र | व्याख्या, भुकंपाचे प्रकार, भुकंप लहरीचे प्रकार, भुकंप व धरणे, भुकंपलेखयंत्राचा ऑक्सीलोग्राफ व विश्लेषण इ. |

**संदर्भ पुस्तके :-**


१. बांधकाम साहित्य, प्रथम वर्ष सिव्हिल डिप्लोमा कोर्स,

२. सिंचन अभियांत्रिकी, तृतीय वर्षाचा डिप्लोमा कोर्स,

३. सार्वजनिक बांधकाम विभाग, हँडबुक – अध्याय - ३३, भाग - २

४. सार्वजनिक बांधकाम विभाग, हँडबुक – अध्याय - ३३, भाग - १

५. जलसंपदा विभाग हँडबुक,अध्याय - १

६. जलसंपदा विभाग हँडबुक,अध्याय - २

७. तांत्रिक अहवाल क्र. SDAD /TR/१३८/२००३

८. सबंधित IS Codes

**प्रश्नपत्रिका २**

## महाराष्ट्र नागरी सेवा नियम, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकामे लेखा संहिता, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका १९८४ व विविध नियम व कायदे.

(गुण-१००)

| अ. क्र. | विषय | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नागरी सेवा | • महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या अटी व शर्ती) नियम, १९८९<br>• महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त) नियम, १९७९<br>• महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१<br>• महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१<br>• महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ |
| २ | महाराष्ट्र सार्वजनिक बांधकामे लेख संहिता | • सर्वसाधारण महसुली जमा व प्रमाणके<br>• सर्वसाधारण भांडार, भांडाराची वस्तुसुची, जमा, जावक, बिनकार्ड, भांडार पडताळणी<br>• हत्यारे व संयंत्रे,<br>• बांधकाम लेखा- मोजमापांच्या नोंदी, देयके व प्रमाणके, अग्रिमे, तात्पुरती अग्रिमे. |
| ३ | महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४ | • लेखनसामग्री व नमुने,निनावी पत्रव्यवहार, शासकीय अभिलेख्यांची विल्हेवाट.<br>• कार्यालयीन कार्यपद्धतीचे सर्वसाधारण नियम, नियतकालिके, प्रशासकीय मान्यता, खर्च मर्यादा, भांडार लेखे (सर्वसाधारण पद्धत, भांडार पडताळणी), हत्यारे व संयंत्रे (सर्वसाधारण, पडताळणी), घसाऱ्याचा दर, भांडाराची विल्हेवाट, भांडार लेखे, गणितीय उपकरणे, सामान खरेदी, सामानाची विल्हेवाट.<br>• परिशिष्ट २४- मोजमापे घेण्याबद्दलचे आणि मोजमाप नोंदवह्या ठेवण्यासबंधीचे नियम,<br>• परिशिष्ट ३९- वैज्ञानिक व गणितीय उपकरणांचा साठा करण्यासंबंधीचे नियम |
| ४. | विविध कायदे व नियम | • माहिती अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२).<br>• महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ (२००६ चा महा ४).<br>• महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ (२००६ चा महा. २१).<br>• आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ (२००५ चा ५३). |

संदर्भ पुस्तके :
१. महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९८१
२. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकामे लेख संहिता, १९८४
३. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, १९८४
४. उपरोक्त तक्त्यात नमुद विविध कायदे व अधिनियम.

**प्रश्नपत्रिका ३**

**प्रात्यक्षिक परीक्षा व मौखिक परीक्षा**

वेळः ३ तास ( प्रात्यक्षिक- २ तास ३० मिनिटे व मौखिक ३० मिनिटे )

| अ.क्र. | परीक्षाचे नाव | प्रश्न संख्या |
|---|---|---|
| १. | प्रात्यक्षिक चाचणी<br>१. माती व मुरूम<br>२. सिमेंट<br>३. राख (फ्लायअॅश)<br>४. पाणी<br>५. वाळू<br>६. खडी<br>७. विटा<br>८. अंशशोधन<br>९. चुना (लाईम)<br>१०. मॉर्टर<br>११. स्टील<br>१२. सीबीआर<br>१३. भूकंप शास्त्र<br>एक. भुकंप लहरी पडताळणी, वादाती आकृती काढणे.<br>दोन. भुकंपमापक बसविणे, ड्राईव्ह मोटर बदलणे, उपकरणांचे अंशशोधन करणे. | उमेदवारास दिलेल्या सामग्रीपैकी एका सामग्रीची (material) प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात येईल. |
| २. | मौखिक चाचणी | मौखिक परीक्षा धरण सांडवा व बांधकाम, लेखा व सामग्रीवरील विविध चाचण्यांवर घेण्यात येईल. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**अनिल देवकाते,**
शासनाचे उप सचिव.

## WATER RESOURCES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated 9th April, 2026.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. TGO 2019/(123/19)/ Est.(Trg).—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra, is hereby pleased to make the following rules to regulate the Departmental Examination for promotion to the post of Scientific Officer (Group-B) in the Office of Director General, Design, Training, Hydrology, Research and Safety, Maharashtra Engineering Research Institute, Nashik in the Water Resources Department, namely :-

1. *Short title.*- These rules may be called Departmental Examination Rules, 2026 for promotion to the post of the Scientific Officer (Group-B).

2. *Definitions.*- In these rules, unless the context otherwise requires,-

(*a*) "Appendix" means the Appendix appended to these rules;

(*b*) "Controlling Officer" means the concerned Zonal Superintending Engineer (Group-A);

(*c*) "Director General" means the Director General, Design, Training, Hydrology, Research and Safety, (DTHRS) Maharashtra Engineering Research Institute (MERI), Nashik;

(*d*) "Examination" means the Departmental Examination conducted as per the syllabus prescribed under rule 8 read with Appendix "A" and Appendix "B" to check the eligibility for promotion to the post of the Scientific Officer (Group-B);

(*e*) "Opportunity" means the chance provided by the Maharashtra Engineering Training Academy, Nashik for Senior Scientific Assistant, Group-C to appear for the Departmental Examination conducted to check their eligibility for promotion to the post of Scientific Officer, Group-B;

(*f*) "META" means Maharashtra Engineering Training Academy, Nashik;

(*g*) "Scientific Officer" means the Scientific Officer (Group-B) under Director General (DTHRS), Maharashtra Engineering Research Institute, Nashik in the Water Resources Department;

(*h*) "Senior Scientific Assistant" means the Senior Scientific Assistant (Group-C) under Director General (DTHRS), Maharashtra Engineering Research Institute, Nashik (Excluding Directorate of Irrigation Research and Development, Pune) in Water Resources Department;

(*i*) "Water Resources Department" means the Water Resources Department of the Government of Maharashtra.

3. *Eligibility to appear for Examination.*- The persons appointed to the post of Senior Scientific Assistant, (Group-C) shall be eligible to appear for the Departmental Examination.

Provided that the person promoted to the post of Scientific Officer prior to the date of this notification, who do not fulfill the condition of passing the professional examination for promotion to the post of Scientific Officer as per the recruitment rules, shall be required to pass the said Departmental Examination.

4. *Number of opportunities for passing Examination.*- (*i*) As passing of the said Examination is condition for promotion to the post of Scientific Officer, the person holding the post of Senior Scientific Assistant shall may avail any number of opportunities to pass the examination.

Provided that, if the Senior Scientific Assistant has been promoted to the post of Scientific Officer before the date of publication of these rules in the *Official Gazette*, those officers shall require to pass the said Departmental Examination in three consecutive opportunities :

(*ii*) Provided also that, three consecutive Departmental Examination to be conducted by Maharashtra Engineering Training Academy, Nashik, After the date of publication of these rules in the *Official Gazette*, shall be considered as three consecutive opportunities :

Provided further that, if the person is eligible to appear for the said Examination but do not submit the Examination form or remains absent for the Examination, then it shall be counted as an opportunity to such person.

5. *Consequences of failure to pass Examination within prescribed opportunities.*- Any person holding the post of Scientific Officer, Before the date of publication of this notification in the *Official Gazette*, who fails to pass the Examination within the prescribed opportunities, his increment shall be withheld till he passes the said Examination or gets exempted from passing the Examination as per rule 6 of these rules, The increment so withheld shall become payable to such person with effect from the date on which he passes the said Examination or exempted from passing the said Examination. The increments so withheld shall be paid in the month of January or July coming after that date, but no arrears for the past period shall be admissible.

6. *Exemption from passing the Examination.*- A person who has completed at least fifteen years on the post of Senior Scientific Assistant or any person promoted to the post of Scientific Officer prior to the date of publication of this notification without passing the said Examination and has completed at least fifteen years on the said post of Scientific Officer or has completed fifty years of age, whichever is later, shall be exempted from passing the said Examination.

7. *Date of passing.*- The day immediately following the next day of the last paper of the Examination, shall be considered as the date of passing of the Examination.

8. *Syllabus.*- Pattern of Examination, number of papers, subjects and minimum qualifying marks to be obtained shall be as specified in Appendix “A” and syllabus of the examination shall be as specified in Appendix “B” or as the State Government may direct by order, from time to time.

9. *Standard of passing.*- The standard of passing the Examination, shall be fifty per cent. of the total marks in each online, practical and oral paper. In case of failure, such person is required to pass the Examination for those subjects in which he is failed.

10. *Special Skills.*- The candidate who passes the Examination in first attempt and obtains seventy percent or more marks in any subject, shall be deemed to have passed the Examination with special skill and an entry to that effect shall be recorded in his service book.

11. *Examination when to be conducted.*- (*i*) The Examination shall be held by the Maharashtra Engineering Training Academy, Nashik, once in a year preferably in the month of March or April. The Examination shall be conducted in Marathi and English language.

(*ii*) The Academy shall declare result of the Examination within a period of sixty days from date of completion of the Examination. The result declared by the Academy shall be final and delay in announcement of result shall not invalidate the Examination.

12. *Training Class.*- Maharashtra Engineering Training Academy, Nashik, shall conduct training class for one month for imparting training to the eligible candidates. The training program shall be completed at least one month prior to the date of holding Examination. It shall be compulsory for eligible candidates to attend the training who is appearing for the Examination for first time. Eligible candidates shall be permitted to attend only one training session.

13. *Conduct in Examination Hall.*- The Controlling Officer of Examination shall restrict the candidate from appearing for the Examination and prohibit the candidate from appearing for rest of the papers if he finds that the candidate is misbehaving in any manner mentioned below, namely:-

(*i*) copying, carrying or referring any document, book, mobile, any electronic gadget or any other material which can be referred for answering the questions;

(*ii*) making conversation with other candidates;

(*iii*) receiving help from any other candidate in any matter;

(*iv*) copying the answer paper of any other candidate;

(*v*) tearing the answer sheets;

(*vi*) any other way or manner of behaviour which may amount to malpractices in the Examination.

14. The Government Resolution No. Wipadho 2620/ C.R.16 / Ka.17, dated the 31st March 2021, regarding the common policy of Departmental Examination and the changes made by the General Administration Department, from time to time, shall be applicable to this rule.

## Appendix A

(Rule 8)

Departmental Examination Paper Pattern for Promotion to the Post of Scientific Officer (Group-B) under the Director General (DTHRS), Maharashtra Engineering Research Institute, Nashik in the Water Resources Department.

| Sr. No. | Subject | Paper Pattern | Total Marks | | | Duration | Passing Marks | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Dams – Spillways and Construction Materials. | Multiple Choice Questions- Online Examination | 100 | | | 1 Hour 30 Minutes | 50 | | |
| 2. | 1. Maharashtra Civil Service Rule,<br>2. Maharashtra Public Works Account Code,<br>3. Maharashtra Public Works Manual, 1984,<br>4. Various laws and Acts. | Multiple Choice Questions- Online Examination | 100 | | | 1 Hour 30 Minutes | 50 | | |
| 3. | Practical and Oral Exam (Select any one material) Soil and Murum, Cement, Fly Ash, Water, Sand, Aggregate, Bricks, Calibration, Lime, Mortar, Steel, CBR, Seismology. | Practical and Oral Examination | Practical | Oral | Total | 3 Hours | Practical | Oral | Total |
| | | | 75 | 25 | 100 | | 38 | 12 | 50 |
| | **Total Marks** | | **300** | | | | **150** | | |

## Appendix – B

(Rule 8)

Syllabus for Departmental Examination for promotion to the post of Scientific Officer (Group B) in the Water Resources Department.

| Paper-1<br>Dams-Spillways and Construction Materials | | |
|---|---|---|
| **Sr. No.** | **Topics** | **Syllabus** |
| 1. | Dams | Types of dams - Earthen dams, Rock fill dams, Masonry and concrete dams, Comparison of earthen and gravity dam Colgrout, Ferrocement etc. |
| 2. | Spillways | Definition, Functions, Types of spillway etc. |
| 3. | Canals | Definition, Parts of canal system, Classification of Canals, Discharge of Canals etc. |
| 4. | Stone | Definition, Types of Stone, Properties, Characteristics of Stone, various tests, etc. |
| 5. | Aggregates | Definition, Types of Aggregate, Properties of Aggregate, various tests, etc. |
| 6. | Lime | Definition, Classification of Lime, Properties of Lime, Use of Lime, various tests etc. |
| 7. | Soil | Definition, Function of soil, Characteristics of a soil, unified soil classification, application of soil, various tests, etc. |
| 8. | Sand | Definition, sources of sand, classification of sand, properties of sand, uses of sand, comparison between natural and artificial sand, various tests, etc. |
| 9. | Bricks | History, uses of bricks, Types of bricks, constituents of bricks, Characteristic of bricks, various tests, etc. |
| 10. | Cement | Definition, Types of cement, various tests, etc. |
| 11. | Mortar | Definition, Ingredients of Mortar, Properties of Mortar, Types of Mortar, Mix design of mortar and concrete, Various Tests etc. |
| 12. | Fly Ash | Definition, properties of fly ash, uses of fly ash, various tests, etc. |
| 13. | Seismology | Definition, types of earthquake, Types of Seismic waves, Earthquake and dams, Accelerographs, Analysis of seismogram, etc. |

**References :**

1. Construction Materials, First Year Civil Diploma Course
2. Irrigation Engineering, Third Year Diploma Course
3. PWD Handbook - Chapter- 33, Part-II
4. PWD Handbook - Chapter-33 Part-I
5. WRD Handbook No 1 ferrocement
6. WRD Handbook No 2 colgrout
7. TM No. SDAD /TR/138/2003
8. Related IS Codes

## Paper-2

### Maharashtra Civil Services Rule, Maharashtra Public Works Account Code, Maharashtra Public Works Manual, 1984 and Various laws and Acts

| Sr. No. | Topics | Syllabus |
|---|---|---|
| 1. | Maharashtra Civil Services Rules | • Maharashtra Civil Services (Terms and Conditions of Service) Rules, 1981<br>• Maharashtra Civil Services (Discipline) Rules, 1979<br>• Maharashtra Civil Services (Leave) Rules, 1981<br>• Maharashtra Civil Services (General Conditions of Service) Rules, 1981,<br>• Maharashtra Civil Services (Discipline and appeal) Rules, 1979,<br>• Maharashtra Civil Services (Leave) Rules, 1981. |
| 2. | Maharashtra Public Works Account Code | • General Revenue Deposits and Certificates,<br>• General store, Store inventory, deposit, outward, bin card, Store verification,<br>• Tools and Machinery,<br>• Construction Accounts -Records of measurements, bills and certificates, advances, temporary advances. |
| 3. | Maharashtra Public Works Manual, 1984 | • Writing materials and Formats, Anonymous correspondence, Disposal of governing records,<br>• General rules of office procedure, Periodicals,<br>• Administrative approval, Sanction limits, Stock accounts (general method, store verification), Weapons and Machinery (general, Verification). Disposal of Store articles, mathematical equipment, Throat Rate, merchandising, Purchase of Goods,<br>• Appendix 24 - Regulations for taking measurements and keeping records of measurements in MB,<br>• Appendix 39- Rules for storing scientific and mathematical instruments. |
| 4. | Various laws and Acts | • Right to Information Act, 2005 (22 of 2005),<br>• Maharashtra Public Records Act, 2005 (Mah. IV of 2006),<br>• Maharashtra Government Servants Regulation of Transfers and Prevention of Delay In Discharge Of Official Duties Act, 2005 (Mah XXI of 2006),<br>• Disaster Management Act, 2005 (53 of 2005). |

**References :**

1. Maharashtra Civil Service Rule -1987
2. Maharashtra Public Works Articles Code -1984
3. Maharashtra Public Works Rule Book- 1984
4. Various laws and Acts as mentioned in above chart

**Paper-3**

**Practical and Oral Exam**

( Practical – 2 ½ hours and Oral - ½ hours)

| Sr. No. | Name of exam | No. of Questions |
|---|---|---|
| 1. | Practical Test<br>1. Soil and murum<br>2. Cement<br>3. Fly Ash<br>4. Water<br>5. Sand<br>6. Aggregate<br>7. Bricks<br>8. Calibration<br>9. Lime<br>10. Mortar<br>11. Steel<br>12. CBR<br>13. Seismology :<br>I. Seismic wave identification, wadati diagram<br>II. Mounting of seismometer, replacement of drive motors, calibration of instrument. | A Candidate has to perform practical test for the given material |
| 2. | Oral Test | Oral conducted on Dams and Spillways, Accounts and Various Tests on Materials. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ANIL DEOKATE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.